☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 408 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 26 / 10 / 2025

# 1)खुन :–

**किनवट** :– दिनांक 25.10.2025 रोजी रात्री 01.00 वा. ते 03.00 वा.चे दरम्यान, **मौ. पाटोदा खु. ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील मयत नामे मंगल कोंडीबा धुमाळे, वय 45 वर्षे, रा. पाटोदा खु. ता. किनवट हिस आरोपी नामे कृष्णा गणेश जाधव, वय 35 वर्षे, रा. पाटोदा खु. ता. किनवट याने माझे सोबत लग्न कर असे म्हणून मारहान करून खुन केला. वगैरे **फिर्यादी दत्ता कोंडीबा धुमाळे, वय 49 वर्षे, रा. पाटोदा खु. ता. किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 296 / 2025 कलम 103(1) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा सह कलम 3(2),(v) अ.जा.अ.ज.प्र.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास श्री भोंडवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग माहूर मो.क्रं. 7738005961** हे करीत आहेत.

# 2)प्राणी संरक्षण कायदा :–

**मरखेल** :– दिनांक 25.10.2025 रोजी 09.50 वा. चे सुमारास, **मौ. हानेगाव रोडवर ता.देगलुर जि.नांदेड येथे**, आरोपी नामे 1.दत्ता नागनाथ चिंतले, वय 21 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. आदमपूर ता.बिलोली 2.सदाशिव लक्ष्मण बतलवाड, वय 65 वर्षे, रा. अटकळी ता. बिलोली यांनी संगनमत करून महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमए–26 / सीएच–2592 किंमत 5,00,000 / –रू चे मध्ये विना परवाना बेकायदेशीररित्या पाच गोवंशीय जातीचे जनावरे किंमत 41,000 / –रू वाहनामध्ये कोंबुन निर्दयीपणे बांधून वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 2864 नारायण पांडूरंग यंगाले, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरन 226 / 2025 कलम कलम 11(1)(ई)(डी) प्राणी छळ प्रतिबंध कायदा सह कलम 47,47(अ),48,50,56 (सी) सह कलम 125 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / हुंडेकर**,मो.क्रं. 8888867757 हे करीत आहेत.

# 3)अवैध गुटखा बाळगला :–

**विमानतळ** :– दिनांक 25.10.2025 रोजी 13.20 वा. चे सुमारास, **आंबेडकर नगर नांदेड येथे**, आरोपी नामे श्रीनिवास शंकरराव गादेवार, वय 40 वर्षे, रा. आंबेडकर नगर नांदेड हा स्वतःचे आर्थीक लाभासाठी विना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा सिगारेट, सुंगधीत तबांखु किंमती 3025 / –रू चा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 214 हनमंत माधवराव पाकलवाड, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 436 / 2025 कलम 6,7 सिगारेट व तंबाखु जन्य उत्पादन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 833 तेलंगे, मो.क्रं. 9527343325** हे करीत आहेत.

# 4)सार्वजनिक अडथळा निर्माण करणे :–

**उमरी** :– दिनांक 25.10.2025 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **गोरठा पाईंट रोड उमरी ता.उमरी येथे**, आरोपी नामे 1. कैलास सोनाजी सुर्यवंशी, वय 35 वर्षे, व इतर सात यांनी संगनमत करून मा.श्री अजित पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांचे सभेत आदेशाचे उल्लघंन करून तोंडी निदर्शने करीत असताना मिळून आले. वगैरे **पोहेकॉ / 680, सुनिल गोपाळराव कोलबुध्दे, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 287 / 2025 कलम 221,3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / कदम, मो.नं. 9623658510** हे करीत आहेत.

# 5)प्रोव्हिबिशन :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 25.10.2025 रोजी 17.20 वा. चे सुमारास, **श्रावस्तीनगर मोकळया जागेत नांदेड येथे**, आरोपी नामे सदाम काझी असिफ काझी, वय 34 वर्षे, रा. तेहरानगर नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 2200 / –रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ / 835 रविशंकर पदमाकर बामणे, नेम. स्थागुशा नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 393 / 2025 कलम 65(ई)म.प्रो.का.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि / सिरसाट, मो.नं. 7020510553** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड